नि.फौ.ख. क्रमांक ६३/२०२३
सरकार वि. स्वप्नील जयवंत गावीत
निशाणी क्रमांक ३९/ क

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. २ याचा शपथेवर जबाब,**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,

**माझे नाव** – उमेश कर्मा गावीत,
**वय** – २८ वर्षे, **व्यवसाय** – शेती,
**राहणार** – ढोरपाडा, ता. नवापुर, जि. नंदुरबार.

**सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एस.बी.पवार यांचे मार्फत.**

मला मराठी भाषा येते. दिनांक ०१.०१.२०२३ रोजी मला पोलिसांनी शिरीष नाईक पेट्रोलपंच येथे नवापाडा रस्त्यावर बोलावले होते. पोलिसांनी माझ्यासमक्ष पंचनामा केला होता. मी पंचनामा वाचुन त्यावर सही केली होती. आता मला पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर अनुक्रमांक ०१ वरील सही माझी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. पंचनाम्यास **निशाणी क्र.४०** देण्यात येते. पोलिसांनी मला दोन दिवसांनी पुन्हा बोलावले होते. त्यावेळी पोलिसांनी तीन काठ्या काढल्या होत्या. पोलिसांनी त्याबाबत लिखापडी केली होती. आता मला काठ्या जप्त केल्याचे तीन पंचनामे दाखवण्यात आले. ते तेच आहे. त्यावरील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर अनुक्रमांक ०१ वरील सही माझी आहे. पंचनाम्यांना अनुक्रमे **निशाणी क्र.४१ ते ४३** देण्यात येते. माझ्यासमक्ष जप्त केलेल्या काठया बघितल्यास मी ओळखु शकतो. न्यायालयात दाखल पी.आर.क्र.१२९/२०२५ हा नारंगी रंगाच्या कागदामध्ये सिलबंद असलेला मुद्देमाल हा सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एस.बी.पवार तसेच आरोपीचे विधीज्ञ पी.जी.गावीत यांच्यासमक्ष उघडण्यात आला. आता मला तीन लाकडी काठ्या दाखवण्यात आल्या. त्या काठया त्याच आहेत. त्यांना अनुक्रमे आर्टीकल अ, ब आणि क देण्यात येत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**साक्षीदाराचा उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. पी.जी.गावीत यांचेमार्फत सुरु.**

२. माझे शिक्षण बी.ए.पर्यंत झालेले आहे. माझे गाव ढोरपाडा आहे. हे म्हणणे खरे आहे की, ढोरपाडा ग्रुप ग्रामपंचायत आहे. आमच्या ग्रामपंचायत मध्ये गरताडी, गडदाणे, अनाळा, बर्डीपाडा, ढोरपाडा, मासलीपाडा ही गावे आहेत. हे मला माहित नाही की, कुवरसिंग झीमा याची पत्नी ग्रामपंचायत सदस्य आहे. मी बिपीन कैलास यास ओळखत नाही. आमच्या गावची उपसरपंच सविता बिपीन गावीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, शिरीष नाईक पेट्रोलपंपवर बरेच लोक पेट्रोल भरण्यासाठी येतात. हे म्हणणे खरे नाही की, शिरीष पेट्रोलपंपापासुन नवापाडा रोडचे अंतर तीन किलोमीटर आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, अंतर एक किलीमीटर आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी मला पेट्रोलपंपवर बोलावले होते. पोलिसांनी मला ९.०० वाजेला बोलावले होते. आता मला

**नि.फौ.ख. क्रमांक ६३/२०२३**
**सरकार वि. स्वप्नील जयवंत गावीत**
**निशाणी क्रमांक ३९/ क**

आर्टीकल अ, ब आणि क दाखवण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, आर्टीकल अ, ब आणि क वरील काठ्यांसारख्या काठया खेडयांमध्ये सर्वत्र उपलब्ध असतात. हे म्हणणे खरे आहे की, एखादी वस्तु जप्त करतांना ती वस्तु ज्याच्या समक्ष केली त्याची व ज्यानी जप्त केली त्या व्यक्तीची सही घेतली जाते. हे म्हणणे खरे आहे की, काठया जप्त करतांना त्या काठयांवर माझ्या सहीचे कागदी चिठ्ठी लावण्यात आली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष काठया जप्त केल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी संजय निंबा गावीत यास ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, मी कुवरसिंग झीमा गावीत व बिपीन कैलास गावीत यांच्या सांगण्यावरुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/--
**(धनंजय एस. देवरे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट क्र. २,
नवापुर.

नवापुर
दिनांक ०२.०५.२०२६